महापालिका आयुक्त ठराव
पुणे महानगरपालिका
ठराव क्र.: मआ/डीईएल/१५४०
दि. २६ /११/२०२६

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.: मआ/मुले/ ३१२२
दि. २६/११/२०२६

-: अधिकार सुपुर्ती आज्ञापत्र :-

विषय :- क्षेत्रिय कार्यालयाकडील/परिमंडळ कार्यालयाकडील निविदा मान्यता अधिकार सुपुर्तीबाबत.
सदंर्भ :- १) "पुणे महानगरपालिका निविदा कार्यप्रणाली प्रपत्र" मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र.६/४५३, दि.०८/०९/२०२२.
२) अधिकार सुपुर्ती आज्ञापत्र जा.क्र. मआ/मुले/२०८२, दि. ११/०९/२०२६.
३) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/६५७, दि. २६/११/२०२६.

महाराष्ट्र शासनाकडील विविध शासन निर्णयान्वये ई-निविदा कार्यप्रणालीच्या अनुषंगाने प्रमृत शासन निर्णयांच्या पार्श्वभुमीवर पुणे मनपाकडील निविदा कामांसाठीच्या सर्वसाधारण अटी-शर्तीचे "पुणे महानगरपालिका निविदा कार्यप्रणाली प्रपत्र" मा.महापालिका आयुक्त ठ.क्र.६/४५३ दि.०८/०९/२०२२ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

क्षेत्रिय कार्यालयाकडील/परिमंडळ कार्यालयाकडील निविदा मान्यतेबाबत संदर्भ क्र. २ अन्वये अधिकार सुपुर्ती आज्ञापत्र पारित करण्यात आले आहे. तथापि, सदर आज्ञापत्रकामध्ये खालीलप्रमाणे अंशत: बदल करणेस मा. महापालिका आयुक्त यांची संदर्भ क्र.३ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

अ.क्र.	प्राधिकारी	अर्थसंकल्पीय तरतुदीस अधीन निविदा मान्य मर्यादा रक्कम
१.	मा. प्रभाग समिती	र.रु. १०.०० लक्ष ते २५.०० लक्ष पर्यत
२.	मा. क्षेत्रिय उप आयुक्त	र.रु. ०५.०० लक्ष ते १०.०० लक्ष पर्यत
३.	मा. महापालिका सहाय्यक आयुक्त	र.रु. ०१.०० लक्ष ते ०५.०० लक्ष पर्यत

Navalkishore

(नवल किशोर राम)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत :
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/वि/ई)
यांजकडेस माहितीसाठी.
उप आयुक्त परिमंडळ क्र. १ ते ५
महापालिका सहाय्यक आयुक्त (सर्व क्षेत्रिय कार्यालये)
यांजकडेस पुढील कार्यवाहीसाठी.